# व्यक्ती-वल्ली - श्री दत्तात्रय जोग

आज माणिक वर्मा यांचं ‘उमज पडेल तर' या चित्रपटातील 'घननीळा, लडिवाळा झुलवु नको हिंदोळा' https://www.youtube.com/watch?v=LL1bZn7YOcw हे अत्यंत श्रवणीय गाणं ऐकत होतो आणि माझ्या मनात जुन्या आठवणी जागृत झाल्या. मी बालमोहन विद्यामंदिर शाळेत असतांना १९५९ साली आमच्या वर्गात गोरा गोमटा, घारे डोळे व कुरळ्या केसांच्या, लोभस दिसणाऱ्या एका विद्यार्थ्याने आपल्या आई-वडिलांसह प्रवेश केला. आणि मृणालिनी आठवले या विद्यर्थिनी शेजारी त्याला बसविले. नंतर आमच्या वाईकर सरांनी सर्वांना त्याची ओळख करून दिली. त्याचं नांव होतं, श्री दत्तात्रय जोग. तो स्थिरस्थावर झाल्यावर त्याचे आई-वडील निघून गेले. मधल्या सुट्टीत या ‘श्री'ची सर्वांना नीटपणे ओळख पटली. जोग मंडळी रत्नागिरीहून मुंबईला वरळी येथे स्थायिक झाली होती. मग, आम्हाला कळलं की याची आई ही सुप्रसिद्ध अभिनेत्री शांता जोग. त्यानंतर १९६० साल उजाडलं. आणि प्लाझा सिनेमागृहात त्याच्या आईचा 'उमज पडेल तर' हा सिनेमा प्रदर्शित झाला. आनंदाची गोष्ट अशी की, आमच्या संपूर्ण वर्ग मित्रांना श्रीच्या आईने त्या चित्रपटाच्या पहिल्या शोचे पासेस दिले होते. अर्थात, आम्ही कांही मित्र-मैत्रिणीच तो सिनेमा पहिला गेलो होतो. शांताबाई श्रीला भेटायला शाळेत आल्यावर एव्हड्या मोठया अभिनेत्री असूनही त्या आमच्याशीही बोलत असत. कांही वर्षांनी श्रीच्या वडिलांची दुसऱ्या ठिकाणी बदली झाली आणि श्रीही शाळा सोडून निघून गेला. त्यानंतर तो कुठे गेला त्याचा कुणालाही थांगपत्ता लागला नाही. मात्र, श्रीला कुणीही विसरणं शक्य नव्हतं. अभ्यासात तो हुशार असल्याने थोड्या वर्षातच त्याचा सर्वांना लळा लागला होता. त्यामुळे त्याची आठवण सर्वांना येत असे.

खालील सर्व फोटो अनंत जोग याच्या सौजन्याने...



*१) श्री जोग याच्या लग्नाच्या वेळी... २) श्री व त्याची पुतणी... ३) श्रीची आई शांताबाई जोग... ४) विमल पंडित व शांता खरे-जोग. नाशिक येथील ११ व्या नाट्य संमेलनात एका नाटकातील भूमिकेत...*

अकरावीची परीक्षा झाल्यानंतर सहाजिक प्रत्येक विद्यर्थ्यांचा मार्ग बदलला. नंतर १९८० मध्ये अचानक एका अपघाताची भयानक बातमी माझ्या वाचनात आली. ती अशी होती: *"महाराष्ट्रात १९८०सालच्या आसपासच्या काळात पेट्रोल-डीझेलची अभूतपूर्व कमतरता होती. त्यामुळे लहान गावात नाटक कंपनीची गाडी, तिथे जाताना इंधनाची दोन-तीन पिपे भरून बरोबर घेत असे. त्याच गाडीत नाटकाची ड्रेपरी, नटांचे कपडेलत्ते व इतर सामान, नाटकात भूमिका करणारे कलावंत आणि अन्य सेवकवर्ग बसबरोबर या गावाहून त्या गावाला जात असे. अशाच एका बसमधून जाताना मुंबई-गोवा महामार्गावर बसला आग लागून त्यात शांता जोग, जयराम हर्डीकर आणि इतर कलावंतांचा शेवट झाला..!"* हे वाचून माझं मन सुन्न-बधिर झालं. त्वरित 'श्री' माझ्या डोळ्यासमोर आला. परंतु, त्याचा पत्ता माहित नसल्याने त्याला संपर्क करणं शक्य नव्हतं. सर्व विचित्र घडलं होतं यात वाद नाही. असो. पुढे दोन वर्षानी आम्ही सर्व अमेरिकेत येऊन स्थायिक झालो होतो. त्यानंतर दहा वर्षानी विलक्षण योगायोग घडला. माझा वर्ग मित्र सुरेश तरे (जो Air Indiaत flight purser होता) यांनी मला सांगितलं, *"जयंत, गेल्या आठवड्यात दुबईला जातांना मला विमानात अचानक आपल्या वर्गातील 'श्री जोग' भेटला. मी त्याला*

*त्वरित ओळखले. आम्ही खूप गप्पा मारल्या. दुबईला त्याच्या घरीही जाऊन आलो. तो डॉक्टर झाला असून तेथे एका हॉस्पिटलमध्ये काम करतो. लवकरच तो कुटुंबियांसह US Virgin Islandला कायमचा रहायला जाणार आहे. तुझी तो आठवण काढीत होता. शाळेत असतांना तुझ्याकडे तो जुनी गाणी ऐकायला येत असे, वगैरे. तुझा फोन नंबर व पत्ता त्याला दिला आहे. हा त्याचा फोन नंबर घे..."*

श्रीचा शोध लागल्याचा मला अत्यानंद झाला होता. नंतर श्री US Virgin Islandला आल्यावर मीच त्याला फोन केला होता. आम्ही खूप गप्पा मारल्या. परंतु, श्रीने मला काळजी वाटणारी अत्यंत वाईट बातमी दिली होती. त्याला बरा न होणारा कॅन्सर झाला होता. शेवटचा पर्याय म्हणून तो टेक्सास येथे त्याच्या उपचारासाठी जाणार होता. त्यातून तो बरा झाला तर, आमची प्रत्यक्ष भेट होईल या आशेवर मी होतो. पण... महिन्याभरातच श्री गेल्याची दुःखद बातमी कानावर आली. हे सर्व योगायोग भयानक व मनाला चटके लावणारे होते. मला कांही दिवस सुचतच नव्हतं...






*१) 'उमज पडेल तर' या १९६० मधील सिनेमाचे पोस्टर... २) गोवा हिंदू असोसिएशनच्या 'नट सम्राट' या गाजलेल्या नाटकात डॉ. श्रीराम लागू व शांता जोग... ३) आणि त्याच नाटकात दत्ता भट व शांता जोग...*

त्यानंतर वीणा जेव्हा मुंबईत गेली होती तेव्हा मी तिला (श्रीच्या धाकट्या भावाचा शोध घेऊन जो अभिनेता म्हणून प्रसिद्ध होता अथवा आहे, त्याला) ‘अनंत जोग’ची भेट घ्यायला सांगितली होती. तो मला नांवाने ओळखत होता. कारण, तो

आणि त्याचा धाकटा भाऊ पण श्री बरोबरच बालमोहनला त्यावेळी आले होते. फोनवर बोलतांना अनंतकडे मी श्रीचे व आईचे कांही फोटो मागितले होते. तेव्हा तो म्हणाला, *"जयंत, मध्यंतरी येथे खूप पाऊस पडला. आम्ही राहतो तेथे सर्वत्र पूर आला होता. आमच्या तळमजल्यावर इतकं पाणी साठलं की, सर्व समान पाण्यात भिजून त्याचा सत्यानाश झाला. त्यात फोटो अल्बम्सही गेले. परंतु, जे कांही भिंतीवर लावले होते त्यातील तुला पुढील आठवड्यात वीणा-वहिनींबरोबर पाठवून देतो..."* त्याप्रमाणे अनंतने ते वीणाला आणून दिले होते. हा त्याचा साक्षेप वाखाणण्यासारखा होता. हे त्याचे कधीही न विसरणारे अनंत उपकार होते..!

मंडळी, त्यांची आई 'शांता दत्तात्रय जोग' या मराठीतल्या एक प्रसिद्ध नाट्य-चित्रपट अभिनेत्या होत्या. वि. वा. शिरवाडकर यांच्या नटसम्राटमध्ये बेलवलकरांच्या भूमिकेत असलेले श्रीराम लागू, दत्ता भट, सतीश दुभाषी आणि चंद्रकांत गोखले या चारही नटसम्राटांच्या बरोबर, पत्नी ‘कावेरी’ हिची भूमिका 'शांता जोग' यांनी साकारली होती. हे आपणांस निश्चित माहित असेल किंवा नटसम्राट हे नाटकही आपण बघितलं असणार. आज त्यांच्या स्मरणार्थ शांता जोग यांचं नाव टिळकनगर, चेंबूर (मुंबई) येथील एका रस्त्याला दिले गेले आहे. ’शांता जोग करंडक’ हा एका नाट्यस्पर्धेत बालनाट्याला दिला जाणारा पुरस्कार आहे. ’महाराष्ट्र नाट्यवर्धक मंडळा’ने आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेनंतर विजयी एकांकिकेस ’शांता जोग स्मृती करंडक’ दिला जातो. या त्यांच्या व श्रीच्या संस्मरणीय आठवणी डोळ्यात आजही पाणी आणतात....

**जयंत विठ्ठल कुळकर्णी.**